विघ्नहर्त्याला सायबर विघ्न निवारणासाठी विद्यार्थ्यांचे साकडे

जे. एम. पटेल कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सुरक्षेचा संदेश

भंडारा, ता. ११ : सन्मित्र गणेश मंडळाद्वारे 'गणेशपूरच्या राजा'चे विसर्जन बुधवारी करण्यात आले. यावेळी मिरवणुकीमध्ये जे. एम. पटेल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम सादर केले.

आज मानव टेकनॉलॉजीच्या युगात जगत आहे. आपले सर्व दैनंदिन कामे टेकनॉलॉजिच्या साहाय्याने सुखकर झालेले आहेत. टेकनॉलॉजिचे अनेक फायदे आहेत. पण या फायद्यांबरोबरच काही धोके सुद्धा आहेत. कधीकधी हे धोके मनुष्याचा घात सुद्धा करीत असतात. सायबर गुन्हेगारीचे हे आता वैश्विक समस्या झालेली आहे. यावर आळा घालण्याकरिता जे. एम. पटेल च्या २० सायबर योद्धयांनी बुधवारी विविध कार्यक्रमांच्या द्वारे सायबर सुरक्षेसाठी जनजागृती केली.

या सर्वांनी गणेशपूरच्या राजासमोर पथनाट्य सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर नृत्याविष्काराद्वारे या विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया आपल्याला कशाप्रकारे बंदिस्त करतो आणि त्यापासून आपण स्वतःचे सरंक्षण कसे करू शकतो हे सर्व नागरिकांना पटवून दिले.

या सायबर योद्धयांनी विविध सायबर गुन्ह्यांबाबत जनसामान्यांना माहिती दिली. त्यांच्या शंकांचे निरसन केले. सायबर गुन्हा झालाच तर त्याची माहिती कशी व कुणाला द्यायची याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी या २० सायबर योद्धयांनी सायबर सुरक्षेबाबत जागृत करून समाजापुढे एक नवा आदर्श प्रस्तुत केला.

या प्रसंगी उपस्थितांना सायबर सुरक्षेची शपथ दिली. या संपूर्ण उपक्रमासाठी प्रभारी प्राचार्य डॉ. प्रदीप मेश्राम, डॉ. कार्तिक पनीकर, डॉ. प्रविण घोसेकर यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी पोलिस अधीक्षक नुरल हसन, सहायक पोलिस अधीक्षक श्री. मोरे, सायबर पोलिस स्टेशनचे ठाणेदार प्रामुख्याने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात सरपंच विद्या मेहर, समुपदेशक सुरेश ठाकरे, अशोक डेंगे, महादेव बिसने उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष रुपेश टांगले, सावन बावणे, पंकज भोंगाडे तसेच सर्व पदाधिकारी यांनी सहकार्य केले.